॥ श्री ॥ 'अनुभूती'

निरंतर माळेमधुनी,
एकेक मोती गळतो आहे,
दिवसांच्या पायचांवरुनी,
प्रत्येक क्षण निखळतो आहे ॥१॥

काही चेहरे वजा आणिक,
खूप आठव जमा आहे.
आठवणींचा विहंग माझा,
अजूनही उडतोच आहे ॥२॥

काळोखाच्या रात्री आणिक,
उगवतीचा सूर्य आहे,
नकोश्या आठवांचा पडदा,
हळूहळू सरतोच आहे ॥३॥

जीवन अजून जगणे आहे,
पण आयुष्य निखळत आहे,
प्रत्येक क्षण आयुष्याचा,
कापूर होवुनी उडतो आहे ॥४॥

माणसे भेटली कित्येक,
आणि मी जोडत गेलो,
पण जोडलेल्या त्या नात्यांनी,
आज पाठ फिरवली आहे ॥५॥

समीर पटवर्धन.
९६८९६७९४२९